# मेट्रो-३च्या भुयारी कामाचा श्रीगणेशा !



मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो भुयारी मार्ग ३ प्रकल्पाच्या भुयारी कामाला अखेर शुक्रवारी माहिम येथील नयानगरमध्ये सुरुवात करण्यात आली. माहिम येथून प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिरापर्यंत हा भुयारी मार्ग खोदण्यात येणार आहे. हा भुयारी मार्ग दोन ते अडीच किलोमीटर लांबीचा असून, मेट्रोच्या संपूर्ण भुयारी मार्गाचे काम दोन वर्षांत पूर्ण केले जाईल.

मेट्रो-३ प्रकल्पाचे खोदकाम टनेल बोअरिंग मशिनच्या मदतीने, माहिममधील नयानगर येथे शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास हाती घेण्यात आले. भुयार खणण्यासाठीचे टनेल बोअरिंग मशिन ११० मीटर लांबीचे असून, ते सप्टेंबर महिन्यात २५ ते ३० मीटर जमिनीखाली नेण्यात आले होते. ४५ दिवसांच्या अवधीमध्ये सशक्त उभारणी करून, शुक्रवारपासून खोदकाम सुरु करण्यात आले.

- मेट्रोचा भुयारी मार्ग हा ३३.५ किमी लांबीचा आहे. दुहेरी टनेलचे काम करण्यासाठी एकूण १७ टनेल बोअरिंग मशिनाचा वापर करण्यात येणार आहे. खोदकामाचा वेग हा भूगर्भातील खडकावर अवलंबून आहे. त्यामुळे ८ ते १४ मीटर दररोज काम करण्याची गती या मशिनची असेल.
- मार्गिकेतील ७ वेगवेगळ्या ठिकाणी टनेल बोअरिंग मशिन भूगर्भात उतरविण्यात येणार आहेत. खडकांचा चुरा करण्याचे वैशिष्ट्य टर्नल बोअरिंग मशिनमध्ये आहे. भुयारी मेट्रोचे काम २ वर्षांत म्हणजे २०१९ पर्यंत पूर्ण होईल. मेट्रो-३ ही डिसेंबर २०२१ रोजी धावेल, असा दावा मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने केला आहे.

“ मुंबई हे बेटाचे शहर आहे, हा प्रकल्प कठीण खडक असलेल्या भागातूनच जाणार आहे. २५ ते ३० मीटर खोल हे काम करण्यात येईल. इमारतीची काळजी घेत आहोत. मुंबईची रचना वेगळी आहे. त्यामुळे काम आव्हानात्मक आहे. जून २०२१पासून आरे कॉलनी ते बीकेसीपर्यंत मेट्रो धावेल. उच्च न्यायालयाने रात्री मेट्रोचे काम करू नये, अशा सूचना दिल्या असून त्याचे पालन करण्यात येत आहे.

**- अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन